# ।। न प

बंधूंनो, सध्या मी करीत असलेल्या सर्वज्ञांच्या तत्त्वसिद्धांतिक प्रबोधनामुळे समाजात बरीच खळबळ माजली आहे. जे जे कुणी हेमाद्री पंडित, ब्रह्मसानू, महदाश्रमाच्या जातकुळीचे असतील त्यांनी माझ्याबद्दल समाजाचा बुद्धेभद करून मला बदनाम करण्याचा चंग बांधलेला आहे. १२ व्या शतकात जेथे त्या काळीच्या ईश्वराला 'दे धरणीमाय थोडी' करून सोडले, अनेक अत्याचार केले, बदनामीच्या अफवा पसरविल्या तेथे माझ्यासारख्या बिचाऱ्या (पोरजीव) पामर जिवाचे काय घेऊन बसता राव! असो, कुणी निंदा कुणी वंदा माझा मात्र आत्मकल्याणाचा धंदा! तोही कलियुगाच्या ईश्वराने सांगितलेला. तो म्हणजे **'अवर धर्मापासौनि काढी परधर्मी लावी : हे काइ साने? ते काइ कव्हणा ठाइं असे?'' ते एथच्या भक्ताचिया ठाइं** असे की!! स्वामी सांगतात, बाई; ईश्वराच्या कर्मकांडविरहित यथार्थ ज्ञानाच्या अज्ञानकारणे वैदिकवादी कर्मकांडात फसलेल्या समाजाला ईश्वराने सांगितलेल्या जिवांच्या 'मानवता धर्माचरणाचा' यथार्थ तत्त्वसिद्धांत अज्ञानात फसलेल्या समाजाला सांगून एकनिष्ठ एकाच साधनदात्या ईश्वराच्या भक्तीला लावणे. तयासि परमेश्वर आपुले प्रेम देती. या सर्वज्ञांनी निरुपिलेल्या आचारसूत्राला अनुसरून समाजप्रबोधन करीत आहे. शिक्षण आणि वैज्ञानिक गुणसूत्रांच्या अभ्यासाने आजचा माणूस फार सुज्ञ आणि जिज्ञासु झालेला आहे. तो प्रत्येक गोष्टीला पुरावा मागतो. तो मागताना स्वामींची सूत्रे पुढे करतो. " **हा प्रचीति पंथ की देमती!**'' म्हणजे ईश्वराने निरुपिलेल्या शास्त्रात असे असेल (एवं) किंवा (वा) तसे नसेल असा संभ्रमित सिद्धांत असूच शकत नाही. ठाम सिद्धांत असला पाहिजे. जो कुणाही बुद्धिवाद्यांना खोडता यायला नको. अशी अपेक्षा आजच्या कॉम्प्युटर युगातला

## ...ळते ।।

नवयुवक करतो आहे. याला कारण आपल्याला सांगितली गेलेली आचारप्रणाली ती म्हणजे त्रिकाळ देव (विशेष) पूजा वगैरे, वगैरे, वगैरे, वगैरे. तात्पर्य आजचा आपला विषय आहे 'न पाळते'. न पाळते या विषयावर माझ्याकडे बरीच पत्रे आली, येत आहेत.

फोनवरून विचारणा होते. प्रत्यक्षात शनिवारी 'लीळा प्रबोधनाच्या दिवशी भारतभरातून कुणीही आर्तवंत येत असतात. प्रत्येकाच्या अनेक प्रश्नांतून (शंका) हा न पाळल्याचा प्रश्न उपस्थित होतोच होतो. आता आपण मुद्द्याकडे वळूया. मी स्वामींच्या सूत्रानुसार पुढे मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. कृपया ज्यांना पटत असेल त्यांनी घ्यावा. माझा अजिबात अट्टहास नाही. ज्यांना पटत (प्रचीती) नसेल त्यांनी दुर्लक्ष करावे, ही माझी नम्र विनंती. आपणास नपाळत्या विषयी सांगितले जातात ते मुद्दे असे १) लग्न समारंभात जेऊ नये. २) नामकरण (बारसे) विधीत जेऊ नये, ३) देवताजनित सणासुदीच्या दिवशी बाहेरचे पदार्थ उ. जीवनावश्यक पदार्थ बाजारातून आणू नयेत, ४) व्रतवैकल्ये चालत असलेल्या घरात अन्न जेऊ नये, ५) नवरात्रीत जीवनावश्यक पदार्थ आणू नयेत, वगैरे वगैरे. नपाळते ठरवून आम्हाला आप्तेष्ट समाजापासून बहिष्कृत म्हणा किंवा दूर ठेवले गेले तर नसेल?

१) लग्न समारंभातील भोजन, २) नामकरण विधीतील भोजन, पेढे हे निमित्ताचे भोजन म्हणून नाकारले आहे. खरे तर अशा या वागण्याचा दुष्परिणाम ईश्वराच्या भक्ताला समाजातून दुषणे लावण्यात होतो. मग शेवटी हे दूषण ईश्वराकडे जात नाही का? तसेच आप्तेष्टाचे, समाजाबरोबरचे आपले जिव्हाळ्याचे संबंध दुरावतात आणि ईश्वर धर्मापासून अप्तेष्ट, समाज फारकत घेतो. याला काय देवाचा धर्म म्हणता येईल का? (पान ४-५ वर...)

# ।। न पाळते ।।

(पान १ वरुन...) ३) देवताप्रीत्यर्थ सणाच्या दिवशी सर्व पदार्थांवर त्या-त्या देवतेची सत्ता असते. म्हणून त्या-त्या दिवशी बाहेरील पदार्थ आणू नयेत, खाऊ नयेत, असे सांगितले आहे. आता आपण विचार करूया की त्याच दिवशी त्या-त्या देवतेची पदार्थावर सत्ता असते की कुणाची? त्याचा आपण सर्वज्ञांच्या तत्त्वसिद्धांतानुसार गोषवारा करूया.

सृष्टिरचनेकाळी मायेचे होणारे विभाग

सृष्टिरचनेकाळी चैतन्यमाया ईश्वराच्या प्रवृत्तीने आपले सामर्थ्य अकरा प्रकारे विभागते. सहा कर्मरहाटीसाठी आणि पाच दैवरहाटीसाठी जड, अजड, चिज्जड, अवगळा, नित्यनर्क, संलग्न अशा या सहा विभागात नटते. या सहा विभागांत जड, अजड हे सामर्थ्य विभाग असून, चिज्जड, अवगळा, नित्यनर्क व संलग्न हे स्वरूपाधार विभाग आहेत. आता आपण फक्त **'जड' आणि 'अजड'** मायेच्या सामर्थ्याविषयी मंथन करूया. सिद्धांत आहे, ''जड माया स्थूळ परमाणुभूत संधीला व्याप असून, केवळ दुःखरूप झाली.''

**'अजड'** अजडमाया परमाणू संधीला व्याप असून, तृणादिकांपासून विश्वफळीयापर्यंत सुख-दुःख मीश्रित झाली. हा सिद्धांत काय सांगतो? म्हणजे गवताच्या (तृण) क्षुल्लक काडीपासून अनेक प्रकारची धान्ये, जड प्रपंचाचे पदार्थ आमि यक्षिणीपासून विश्वदेवतेच्या मोक्षफळाला गेलेल्या जिवला 'अजड' मायेच्या चेष्टकत्वाने सुख-दुःख भोगवले जाते. म्हणजेच सर्व पदार्थांत **'अजड'** मायेचे सामर्थ्य आहे. आणि म्हणूनच आपण मायामोहीत प्रपंच म्हणतो. मग विचार करा, माया मोठी की तिच्या खालील देवता मोठ्या? मायेचे सामर्थ्य कुठे आणि इतर देवतांचे सामर्थ्य कुठे? दुसरा मुद्दा असा उपस्थित होतो, की देवतांच्या सणाच्या दिवशी माया आपले सामर्थ्य सर्व पदार्थांवरून काढून घेते काय? असा सर्वज्ञांचा सिद्धांत कुठे आहे? जर असे आहे तर नपाळते, नपाळते म्हणून आपणाकडून अजडमायेची 'हेटाळणी' तर होत नाही ना? अशाने अजडमायेचा 'क्षोभ' आपण ओढवून घेत तर नाही ना? याचा आपण प्रत्येकाने विचार नको का करायला?

वरील अगदी थोडक्यात झालेले 'अजड' मायेचे विश्लेषण. आता आपण 'पिंडस्था निर्वच' काय सांगतो ते पाहू, शोधू, मंथन करून यथार्थ जाणून घेऊ.

सृष्टी रचनेकाळी ईश्वराच्या प्रवृत्तीने, मायेच्या चेष्टकत्वाने विश्वेपासून यक्षिणीपर्यंत देवता आपले सामर्थ्य दोन विभागांत प्रसारण करतात. एक ब्रह्मांडस्था आणि दुसरे ओळगण्या. ओळगण्या ईश्वर अवताराची सेवा करण्याच्या हेतूने झाल्या आणि ब्रह्मांडस्था ब्रह्मांडाचा व्यापार करण्यासाठी झाल्या. पुढे ब्रह्मांडस्थ देवतांपासून पुन्हा दोन विभागांत सामर्थ्य प्रसारण पावते. ते १) **पिंडस्था** आणि २) **विग्रह**. विग्रहाचे सोडू या. आता फक्त पिंडस्थाचे पाहूया. पिंडस्था का झाल्या, तर '**पिंडस्था पिंड** युक्तत्वाकारणे झाल्या.' त्या कशा कशा नटल्या ते पाहू. १) कर्मभूमीच्या देवतांच्या पिंडस्था पायांच्या अंगठ्यापासून घोट्यापर्यंत नटल्या आहेत. २) अष्टदेवयोनी देवतांच्या पिंडस्था अंगठ्यापासून गुडघ्यापर्यंत नटल्या आहेत. ३) अंतराळीच्या देवतांच्या पिंडस्था अंगठ्यापासून जांघेपर्यंत नटल्या आहेत. ४) स्वर्गीच्या देवतांच्या पिंडस्था अंगठ्यापासून नाभीपर्यंत नटल्या आहेत. ५) सत्य, कैलास, वैकुंठीच्या देवतांच्या पिंडस्था अंगठ्यापासून वक्षस्थळापर्यंत नटल्या आहेत. **(पान ८ वर...)**

# ॥ न पा

(पान ५ वरून...)

६) क्षिराब्धीच्या देवतांच्या पिंडस्था अंगठ्यापासून उरापर्यंत नटल्या आहेत. ७) अष्टभैरव देवतांच्यए पिंडस्था अंगठ्यापासून कंठापर्यंत व दोन भूजा. ८) विश्वदेवतेच्या पिंडस्था आपादमस्तक म्हणजे पायांच्या नखाग्रापासून डोईवरील केसाग्रापर्यंत नटली आहे. ९) चैतन्यमायेचा 'संलग्न' जीवस्वरूपी मिसळला. पिंडस्था देवता मेदमांसाधारे पिंडाच्या ठिकाणी आहेत. हे कशावरू? 'सर्वज्ञ म्हणितले : **ब्रह्मांडी मूर्ती देवता. पिंडी मेदमांसारूपा देवता.**" या अर्थी. मग पिंडस्थादेवता पिंडाधारे कशा कशा राहतात? तर १) विश्वेची पिंडस्था मेदाधारे राहते. म्हणजे शरीरातील हाडांधारे राहते. २) अष्टभैरवांच्या पिंडस्था मांसाधारे राहतात. ३) तर क्षिराब्धीपासून यक्षिणीपर्यंतच्या पिंडस्था देवता चर्माधारे म्हणजे त्वचेधारे परमाणू संधीला व्यापून आहेत.

आता विचार करा. आपल्या संपूर्ण पिंडाला चैतन्य मायेच्या संलग्नापासून शेवटील यक्षिणी देवतेने व्यापले आहे. आणि अशा नपाळत्यांत आपण आकंठ बुडालेले आहोत. वावरतो आहोत. तर अशा या नपाळत्याला आपण आपल्यापासून दूर करून जिवंत राहू शकतो काय?

मग या नपाळत्याचे स्तोम माजवून आपल्याला कुणी तरी अज्ञात वैदिकवाद्याने हा ईश्वराचा 'मानवताधर्म' सर्व स्तरांतील समाजापर्यंत जाऊ नये याची तजवीज तर करून ठेवली नसेल? असे मला पामराला वाटते. दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो, की नपाळत्या दिवशी मुसलमान, इराणी, ख्रिश्चन धर्मीयांकडून पदार्थ घेतले तरी चालतात. असे सांगितले जाते, तर विचार करा स्वामी सांगतात, "हिंसा वर्ते तीए स्थानी महात्मेयां असुं नए!" मग या तिन्ही धर्मात अखंड हिंसा चालते. त्यांच्याकडील पदार्थ घेतला तर चालतो? तो कसा? दुसरे म्हणजे त्या दिवशी त्यांच्या घरातील किंवा दुकानातील पदार्थांवरून 'अजडमाया' आपले सामर्थ्य काढून घेते काय? दुसरे म्हणजे नदी, विहीर, नळाचे पाणी कसे चालते? त्या पाण्यातील **अजडमाया** त्या दिवसापुरते पाण्यातील आपले सामर्थ्य काढून घेते काय?

**समारोप :** मी वरील सर्वज्ञांच्या तत्त्वसिद्धांताला धरून केलेले विवेचनात्मक स्पष्टीकरण ज्यांना पटत असेल त्यांनी त्याचा कसा उपयोग करावा हे सर्व अधिकार ज्याच्या-त्याच्या वैचारिक आणि मानसिक प्रवृत्तीवर अवलंबून आहेत. मी लिहिलेलेच खरे असेल असे अंधश्रद्धेने मानून घेऊ नये. **'मंथन कीजे मग नूतन होए!'** शास्त्रोक्ति, सोक्ति, लोकोक्ति या स्वामी वचनाला अनुसरून ज्याने-त्याने योग्य तो निर्णय घ्यावा, ही नम्र

ळते!!

विनंती.

बऱ्याचशा विषयांवर बरेचसे स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे. मला बऱ्याच विषयांवर स्पष्टीकरणासाठी बरीचशी पत्रे आली आहेत. येत आहेत; परंतु सध्याच्या सामाजिक मानसिकतेला पाहता त्या सर्वांचे स्पष्टीकरण करणे मला सध्या तरी योग्य वाटत नाही. माझा 'घात' होण्याची शक्यता सध्या बळावली आहे. त्या काळी त्या काळीचे धर्ममार्तंड **"हे श्री चांगदेवराऊळ आमचा मार्ग उच्छेदीति!"** असे स्वामींना म्हणत होते. तोच प्रकार आज माझ्याविषयी काही मंडळी म्हणत आहेत. 'हा कुडव आमचा मार्ग नष्ट करतो आहे'!

एक विचार करा, लक्षात घ्या, की नपाळते नपाळते म्हणून देवतांची 'हेटाळणी' करून आपण देवतांचा क्षोभ ओढवून तर घेत नाही ना? ज्या अर्थी पदार्थ विघटन होत असताना पदार्थाला दुर्गंधी सुटते, तेव्हा शी, शी करून जो त्या पदार्थाची हेटाळणी (विचिकित्सा विकल्प) करतो त्याला अशा क्रियेने 'प्रतिदेहाची' नरकयोनी भोगावी लागते. स्वामींचे सूत्र आहे, **"विकल्प (हेटाळणी) आतिः प्रतिदेह आति!!"**

**तात्पर्य** :- सर्वज्ञांचा 'मानवता धर्म' प्रचिती पंथ समाजातील सर्व स्तरांपर्यंत, सर्व घटकांपर्यंत जाऊ नये, यासाठी कुणी वैदिकवाद्याने नपाळत्याचा बागूलबुवा उभा केला तर नसेल? कुडव नपाळते पाळत नाही म्हणून अर्थाचा अनर्थ करून समाजात माझ्या अवहेलनेचे कुभांड रचले गेले आहे. मी अशांना दोष देत नाही. "मास्तर चुकला! भुकी बिचारी कुणीही हाका!" ईश्वराचे ऐकावे की जिवाचे ऐकावे हे ज्याने त्याने ठरवावे. **'जीव जिवाचे म्हणीतले करीति** : ईश्वराचे म्हणीतले कहीचि न करीति :।"

**सूचना** : माझ्या अच्युतगोत्रियांना नम्र विनंती, की नपाळत्या विषयी ईश्वराला साक्षी ठेवून ईश्वराने निरुपिलेला तत्त्वसिद्धांत माझ्या अल्पबुद्धीने तुमच्यासमोर सादर केला. पटेल त्यांनी धरावा, न पटेल त्यांनी सोडावा; पण 'नपाळत्याविषयी जाणण्यासाठी पुन्हा कुणीही मला पत्र पाठवू नका. आणखी स्पष्टीकरणात्मक जाणून घेण्याची इच्छा असेल त्यांनी प्रत्येक शनिवारी ४ ते ८ दरम्यान 'सर्वज्ञ समाजप्रबोधन संस्थे'त भेट द्यावी, ही नम्र विनंती.

सुंदर विचार आणि शुद्ध आचाराची जोपासना
हीच खरी ईश्वरप्राप्तीची उपासना, जय श्री चक्रधर

प. से. सी. कृ. कुडव